मागणी क्र. झेडएच-५, लेखाशीर्ष -४४०२ २७३४
आदर्शगांव विकास कार्यक्रमांतर्गत सन २०१९-२०
चे अनुदान वाटप करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## मृद व जलसंधारण विभाग
### शासन निर्णय क्रमांकः आगायो- २०१९/प्र.क्र.७०/जल-८

मादामा कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- ०३ ऑगस्ट, २०१९

वाचा - शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रमांक :

१) आगायो-२०१०/प्र.क्र.४५/जल-८, दिनांक १३ ऑगस्ट, २०१०
२) आगास-२०१४/प्र.क्र.६५/जल-८, दिनांक २२ डिसेंबर, २०१४
३) आगायो-२०१३/प्र.क्र.१६२/जल-८, दिनांक १० मार्च, २०१५
४) आगायो-२०१४/प्र.क्र.६५/जल-८, दिनांक १४ मार्च, २०१६
५) मृद व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.आगायो-२०१४/सं.क्र.५३७/प्र.क्र.९१/जल-८, दिनांक २५ ऑक्टोबर, २०१७
६) मृद व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. आगास-२०१४/प्र.क्र.६५/जल-८, दिनांक ५ सप्टेंबर, २०१८
७) मृद व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. आगायो-२०१८/प्र.क्र.१०८/जल-८, दिनांक १९ डिसेंबर, २०१८
८) मृद व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र. आगायो-२०१८/प्र.क्र.१०८/जल-८, दिनांक ०२ मार्च, २०१९
९) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दिनांक ८ जुलै, २०१९
१०) कृषि उपसंचालक, आदर्शगांव संकल्प व प्रकल्प समिती, कृषि आयुक्तालय, पुणे यांचे
पत्र क्रमांक-१) आगायो/वायो १९-२०/निधी मागणी/२१८/१९, दिनांक ०७/०५/२०१९,
२) आगायो/उपयोगिता प्रमाणपत्र/१०४/१९, दिनांक १ मार्च, २०१९,
३) आगायो/उप.प्र.२०१८-१९/३४३/२०१९, दिनांक २८ मे, २०१९,

प्रस्तावना :-

आदर्शगांव विकास कार्यक्रमांतर्गत संदर्भाधीन क्र. ३ येथील दिनांक १० मार्च, २०१५ च्या शासन निर्णयान्वये अनुज्ञेय आर्थिक घटकावर आणि बिगरगाभा क्षेत्रावर वितरीत होणारा निधी खर्च करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार आदर्शगांव विकास कार्यक्रमांतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या निधीतून, शासन निर्णय, दिनांक २५/१०/२०१७ अन्वये प्रशिक्षण केंद्राच्या बांधकामास दिलेल्या प्रशासकीय मान्यतेच्या अधिन, तसेच संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन तथा सदस्य सचिव, आदर्शगांव योजना संकल्प व प्रकल्प समिती, पुणे यांनी त्यांच्या दिनांक १२ मार्च, २०११ च्या पत्रामध्ये नमूद केलेल्या कामांव्यतिरिक्त इतर कामांवर निधी खर्च होणार नाही, या अटीच्या अधिन, तसेच वित्त विभागाच्या प्रशिक्षण केंद्राच्या बांधकामास टप्प्याटप्प्याने निधी वितरीत करण्याच्या अटीच्या अधीन प्रशिक्षण केंद्राच्या बांधकामासाठीच्या रु.५९९.७० लक्ष निधीचे तीन टप्प्यात वाटप करण्यात येऊन, त्यापैकी पहिल्या टप्प्यासाठी संदर्भाधीन क्र.७ येथील दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.१९९.९० लक्ष व दुसऱ्या टप्प्यासाठी संदर्भाधीन क्र.८ येथील दिनांक ०२ मार्च, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.२००.०० लक्ष असा एकूण रु.३९९.९० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे.

आदर्शगांव विकास कार्यक्रमासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात एकूण रु.१७००.०० लक्ष इतका नियतव्यय मंजूर असून, वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्र. ९ येथील दिनांक ८ जुलै, २०१९ च्या परिपत्रकान्वये सन २०१९-२० च्या प्रथम नऊमाहीकरिता (डिसेंबर २०१९ अखेर) आवश्यक असणारा कार्यक्रमांतर्गत खर्चाचा अर्थसंकल्पित निधी एकूण वार्षिक तरतुदीच्या ६० टक्केच्या मर्यादेत अर्थसंकल्पीय अंदाज, वितरण व सनियंत्रण प्रणालीद्वारे (बीम्स) वितरीत करण्यास मंजूरी दिली आहे. त्यानुसार संदर्भाधीन क्र.१० येथील दिनांक ०७ मे, २०१९ च्या पत्रान्वये मागणी केल्यानुसार, प्रशिक्षण केंद्राच्या बांधकामाच्या अंतिम टप्प्यासाठी वितरीत करावयाचा रु. १९९.८० लक्ष (रुपये एकशे नव्यान्नव लक्ष ऐंशी हजार फक्त) इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

आदर्शगांव विकास कार्यक्रमांतर्गत संदर्भाधीन क्र. ३ येथील दिनांक १० मार्च, २०१५ च्या शासन निर्णयान्वये अनुज्ञेय आर्थिक घटकावर आणि बिगरगाभा क्षेत्रावर वितरीत होणारा निधी खर्च करण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार आदर्शगांव विकास कार्यक्रमांतर्गत सन २०१९-२० या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या रु. १७००.०० लक्ष निधीतून, संदर्भाधीन क्र. १० येथील दिनांक ७ मार्च, २०१९ च्या पत्रान्वये मागणी केल्यानुसार, शासन निर्णय, दिनांक २५/१०/२०१७ अन्वये प्रशिक्षण केंद्राच्या बांधकामास दिलेल्या प्रशासकीय मान्यतेच्या अधिन, तसेच संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन तथा सदस्य सचिव, आदर्शगांव योजना संकल्प व प्रकल्प समिती, पुणे यांनी त्याच्या दिनांक १२ मार्च, २०११ च्या पत्रामध्ये नमूद केलेल्या कामांव्यतिरिक्त इतर कामांवर निधी खर्च होणार नाही या अटीच्या अधिन, प्रशिक्षण केंद्राच्या बांधकामाचा अंतिम टप्प्याचा निधी रु.१९९.८० लक्ष (रुपये एकेश नव्यान्नव लक्ष ऐंशी हजार फक्त) इतका निधी वितरीत करण्यात येत आहे.

२. हा निधी कोषागारातून आहरण व संवितरण करिता **"कार्यासन अधिकारी मृद-५ तथा कृषि उपसंचालक (आदर्शगाव) पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी"** म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर निधी खर्च करतांना दिनांक १० मार्च, २०१५ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या आदर्शगांव योजनेच्या नवीन मार्गदर्शक सूचना मधील अटी व शर्तींचे पालन करण्यात यावे आणि ज्या उद्दिष्टासाठी निधी वितरीत केलेला आहे त्याच उद्दिष्टासाठी खर्च करण्यात यावा.

४. वितरित केलेला निधी मंजूर केलेल्या बाबींवर खर्च होईल याची दक्षता घेण्यात यावी. या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास नियमितपणे सादर करण्यात यावा.

५. यावर होणारा खर्च खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा आणि सन २०१९-२० या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा :-

**मागणी क्र.झेडएच-५,**
**प्रधान लेखाशिर्ष ४४०२- मृद व जलसंधारण यावरील भांडवली खर्च**
**(००) (१०२) मृदसंधारण, (०१) पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम**

**(०१) (०३) आदर्श गाव विकास कार्यक्रम (कार्यक्रम)**
**(४४०२ २७३४), ५३ मोठी बांधकामे**

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक ९ येथील दिनांक ८ जुलै, २०१९ च्या शासन परिपत्रकान्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक **२०१९०८०३११४२०३०२२६** असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravi Shivaji Vhatkar

Digitally signed by Ravi Shivaji Vhatkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Soil and Water Conservation, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bca9a9d38f4447074d53ffd7129d6c978023dfe7631 1c98a4ffd7de9447d9bb9, serialNumber=85ad116139ecb1182dd7fbef85e39485778bb 2d61f5a53c998ffd46129875c23, cn=Ravi Shivaji Vhatkar
Date: 2019.08.03 15:49:06 +05'30'

( र. शि. व्हटकर )
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
३. मा. विरोधी पक्षनेते, विधानसभा / विधानपरिषद यांचे खाजगी सचिव महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई,
४. सर्व सन्माननिय संसद सदस्य व विधानसभा / विधानपरिषद सदस्य,
५. मा. मंत्री (मृद व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव,
६. मा. राज्यमंत्री (मृद व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव,
७. मा. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
८. कार्याध्यक्ष, आदर्शगाव संकल्प व प्रकल्प समिती, पुणे,
९. मुख्य सचिव यांचे सचिव,
१०. सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,
११. महासंचालक, माहिती व जनसंपर्क (प्रसिध्दीकरीता),
१२. सर्व विभागीय आयुक्त,
१३. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१४. संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१५. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१६. सर्व उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय,
१७. कृषि उपसंचालक, आदर्श गांव संकल्प व प्रकल्प समिती,कृषि भवन, पुणे-५,
१८. महालेखापाल, महाराष्ट्र १/२(लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता ) मुंबई / नागपूर,
१९. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,

२०. अधिदान व लेखाधिकारी /निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
२१. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे,
२२. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,
२३. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,
२४. कक्ष अधिकारी/ जल-११, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई,
२५. कार्यासन जल-८ (निवड नस्ती), मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई .